आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० डिसेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांची आज अर्थतज्ञ आणि विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी चर्चा

- २०४७-४८पर्यंत भारत २६ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने प्रवास करत आहे असा अन्स्र्ट अँड यंग चा अहवाल

- पिनाक या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची चांदीपूर इथं यशस्वी चाचणी

- महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपणार

**आणि**

- मुंबईत भांडुप इथं बेस्ट बसच्या धडकेत ४ जणांचा मृत्यू तर ९ जखमी

**<><><><><>**

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अर्थतज्ञ आणि विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी चर्चा करणार आहेत. या बैठकीला नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी, सीईओ बीव्हीआर सुब्रमण्यम हे देखील उपस्थित असतील.

२०२६-२७ साठीचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री एक फेब्रुवारीला सादर करतील. अमेरिकेने भारतावर लादलेलं ५० टक्के आयात शुल्क तसंच इतर आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प महत्त्वाचा असेल.

**<><><><><>**

२०४७-४८ सालापर्यंत भारत २६ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने प्रवास करत असून, दरडोई उत्पन्न, १५ हजार डॉलर्सपेक्षा जास्त, म्हणजेच सध्याच्या जवळजवळ सहा पट राहील, असा अंदाज अन्स्र्ट अँड यंग च्या अहवालात वर्तवण्यात आला आहे. पुढल्या दशकात आणि त्यापुढे जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचं स्थान मजबूत करण्यासाठी विकासाला चालना देणारे अनेक घटक महत्त्वाची भूमिका बजावतील असं यात म्हटलं आहे.

२०३० साला पर्यंत भारत, जर्मनी आणि जपानला मागे टाकून चीन आणि अमेरिकेनंतरची जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, अशी अपेक्षा असून, येत्या काही दशकांमध्ये भारताचा विकासदर जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक राहील, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे.

**<><><><><>**

देशाच्या औद्योगिक उत्पादनातली वार्षिक वाढ दर्शवणाऱ्या IIP अर्थात औद्योगिक उत्पादन वाढ निर्देशांकाने यावर्षीच्या नोव्हेंबरमध्ये गेल्या २५ महिन्यातली सर्वाधिक पातळी गाठली आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये या निर्देशांकांत ११ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ झाली होती. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या माहिती नुसार उत्पादन क्षेत्रात ८ टक्क्यांनी झालेल्या वृद्धीमुळे या निर्देशांकांत वाढ झाली आहे.

**<><><><><>**

भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, डिआरडीओच्या पिनाक या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची चांदीपूर इथं यशस्वी चाचणी झाली. या क्षेपणास्त्राची क्षमता १२० किलोमीटर अंतरावरील लक्ष्य भेद करण्याची आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशस्वी मोहिमेबद्दल डीआरडीओचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र सरकारनं सरत्या वर्षात विविध उपक्रम राबवले आहेत. हे वर्ष भारतासाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचं ठरलं. जगभरात भारताची वेगळी सांस्कृतिक ओळख निर्माण करण्यात यावर्षी देशाला यश आलं आहे. ऐकूया भारताच्या या वर्षातल्या सांस्कृतिक क्षेत्रातल्या वाटचालीविषयी….

**-----------व्हीसी---------------**

*(सरत्या वर्षात प्रयागराज इथं भरलेला कुंभमेळा हा जगातला सर्वात मोठा धार्मिक सोहळा ठरला. जवळपास ६६ कोटी भाविकांनी कुंभमेळ्यात सहभाग घेतला. यामुळे श्रद्धा, अध्यात्म आणि परंपरा यांचं अद्वितीय दर्शन जगाला झालं. याच वर्षी अयोध्येतल्या राम मंदिरावर धर्मध्वजारोहण सोहळा झाला. देशाच्या सांस्कृतिक पुुनरूत्थानाचं हे प्रतीक असल्याचं मानलं जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात देशभरातून भाविक सहभागी झाले होते. यासोबतच ५२४ वर्षं जुन्या त्रिपुर-*

*सुंदरी मंदिराचा पुनर्विकास यावर्षी पूर्ण झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पुनर्विकसित मंदिराचं उद्धाटन झालं. चोल सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या सागरी मोहिमेला एक हजार वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्र्यानी गंगईकोंडा चोलपुरम इथं भेट दिली आणि भारताच्या नौदल पराक्रमाच्या वारशाचा गौरव केला. राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या दीडशेव्या वर्धापनदिनानिमित्त देशभरात कार्यक्रम साजरा झाले. प्रधानमंत्र्यांनी ७ नोव्हेंबरला या कार्यक्रमाचं औपचारिक उद्धाटन केलं. त्याचप्रमाणे यावर्षी पिपरहवा इथून भगवान गौतम बुद्ध यांचे पवित्र अवशेष भारतात परत आणण्यात आले. १२७ वर्षांनंतर हे अवशेष परत आणून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेला उजाळा देण्यात आला.)*

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी आपला २०२६ या नववर्षाचा संदेश ‘हिंदी’ भाषेतही प्रसिद्ध केला आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये हिंदी भाषेची पोहोच वाढवण्याच्या भारताच्या प्रयत्नांमधला हा महत्त्वाचा टप्पा आहे. आगामी वर्षात आंतरराष्ट्रीय समुदायानं शांतता आणि जागतिक विकासाला प्राधान्य द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे. गुटेरस यांच्या संदेशाच्या चित्रफितीत हिंदीतून उपशीर्षकं दिली आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे.उद्या या अर्जांची छाननी होईल. २ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल

आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल.

दरम्यान, विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांमध्ये पक्षांतर तसंच युती सारख्या हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडी स्थानिक घटकांवर जोर देत वेगवेगळ्या तडजोडी करत आहेत.जागा वाटपाच्या हालचालींनाही वेग आला आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - - होल्ड- व्हॉईस कास्ट - -**

*(मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीचे जागावाटपाचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. १३७ जागी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार तर ९० जागी शिवसेनेचे उमेदवार*

*असं वाटप करण्यात आलं आहे. रिपब्लिकन पक्षाला जागावाटपातून वगळल्याबद्दल पक्षाध्यक्ष रामदास आठवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा आपला विश्वासघात झाल्याची भावना त्यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे. रिपाई ५० जागांवर उमेदवार उभे करणार असल्याचं पक्षसूत्रांनी सांगितलं. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्ष यापूर्वीच वेगळा झाला आहे.*

*छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी काल पर्यंत शिवसेनेच्या वतीने ५३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं १८ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.*

*कोल्हापूरमध्ये महायुतीमध्ये एकमत झालं असून ८१ पैकी भाजपा ३६ जागांवर निवडणूक लढवणार असून शिवसेनेला ३० तर राष्ट्रवादी काँग्रेसला १५ जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे, कोल्हापूरमध्ये महाविकास आघाडीमध्ये फुट पडली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षानं तिसऱ्या आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे. त्यामुळं कोल्हापुरात काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट एकत्रित निवडणूक लढवत आहेत.*

*धुळे महापालिका निवडणुकीसाठी भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. तर महाविकास आघाडी एकत्रितपणे लढणार आहे.)*

**<><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग-एमपीएससीच्या अध्यक्षपदी भारतीय प्रशासन सेवेतले वरिष्ठ अधिकारी विवेक भीमनवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भातली अधिसूचना जारी केली असून भीमनवार यांनी पदभार स्वीकारला आहे. २००९ च्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या तुकडीतले अधिकारी भीमनवार यांनी यापूर्वी वाहतूक विभागात आयुक्त म्हणून काम केलं आहे. सहा वर्षे किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत ते या पदावर कार्यरत राहणार आहेत.

**<><><><><>**

मुंबईत भांडुप इथं काल रात्री 'बेस्ट' च्या गाडीने धडक देऊन झालेल्या अपघातात चार पादचाऱ्यांचा मृत्यू झाला, तर ९ जण जखमी झाले. बस चालकाला ताब्यात घेतलं असून त्याच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

भांडुप बस दुर्घटनेबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. दुर्घटनेतल्या मृतांच्या नातेवाईकांप्रति त्यांनी सह वेदना व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भांडुप बस दुर्घटनेत झालेल्या जीवित हानीबद्दल शोक व्यक्त केला असून, दुर्घटनेतल्या मृतांच्या प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

उत्तराखंडमधल्या अल्मोडा जिल्ह्यात आज झालेल्या बस अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. ही बस भिकीयासैनवरून रामनगरला जात असताना हा अपघात झाल्याचं राज्य आपत्ती प्रतिसाद दलाने सांगितलं. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून बचावकार्य सुरू आहे.

<><><><><>

बांगलादेशच्या माजी प्रधानमंत्री खालिदा झिया यांचं आज सकाळी ढाका इथं निधन झालं.  त्या ८० वर्षांच्या होत्या. दोन वेळा प्रधानमंत्री पदावर राहिलेल्या खालिदा झिया, यांनी अनेक दशकं बांगलादेशच्या राजकारणावर आपला प्रभाव पडला, आणि बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचं अध्यक्षपद भूषवलं. खालिदा झिया यांच्या पार्थिवावर येत्या बुधवारी अंत्यसंस्कार होणार आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बेगम खालिदा झिया यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. बांगलादेशच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून, बांगलादेशच्या विकासात, तसंच भारत-बांगलादेश संबंधांमध्ये त्यांनी दिलेलं योगदान नेहमीच स्मरणात राहील, असं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

बांगलादेशचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी खालिदा झिया यांच्या निधनाबद्दल, देशात तीन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातला २० षटकांचा पाचवा आणि अंतिम सामना आज तिरूवनंतपुरम इथं खेळला जाणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल. पाच सामन्यांच्या मालिकेतले चार सामने जिंकून भारतानं विजयी

आघाडी घेतली आहे. आजचा सामना जिंकून या मालिकेत निर्भेळ यश मिळवण्यासाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ उत्सुक असेल.

**<><><><><>**

उत्तर भारतात थंडीचा जोर कायम असून, हरियाणा, चंदीगड, पश्चिम उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये उद्यापर्यंत सकाळी आणि रात्री वेळी दाट धुक्याचा  थर राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

जम्मू काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद आणि मध्य प्रदेशमध्ये आज, तर दिल्ली, झारखंड आणि अरुणाचलप्रदेशमध्ये उद्या वातावरणात दाट धुकं राहील. पंजाब, हरियाणा, चंदीगड, पश्चिम मध्य प्रदेश, झारखंड आणि छत्तीसगडच्या काही भागात आज थंडीची लाट राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

दरम्यान, राजधानी दिल्ली परिसरात हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, आज सकाळी सरासरी गुणवत्ता निर्देशांक ३८४  इतका नोंदवला गेला.

**//<><><><><>//**